| | |
|---|---|
| MHKO140000122010 | **<u>रे.दि.मु.क्र.०७/२०१० मधील निशाणी ४२ वरील आदेश</u>**<br>श्रीमती.जक्कुबाई पांडुरंग गावडे.<br>**विरुद्ध**<br>श्री. नागेंद्र बाळु हैबती. |

वादींनी सदर अर्ज मुदत अधिनियम कलम ५ प्रमाणे मयत वादी क्र.०१–ड याचे विरुद्ध नियमानुसार झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेकामी अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळणेकामी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश होणेकामी अशी हरकत घेतलेली आहे.

०२. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादींच्या वतीने विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादी क्र.०१–ड संजय गावडे हे दिनांक १३.०५.२०२० रोजी मयत झालेले आहेत. सदर वादी क्र.०१–ड यांना त्यांची पत्नी व अज्ञान मुलगा असे वारस आहेत. सदर वारसांना दाव्यास कारण अस्तित्वात आहे. कोवीड विषाणुच्या प्रादुर्भावामुळे व मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील एस.ओ.पी. मुळे वादीस मयत वादी क्र.१–ड याचे वारस मुदतीमध्ये फौलावर घेता आले नाही. वादीने जाणुन बुजुन विलंब केलेला नाही. वादीने सदर अर्जासोबत अबेटमेंट आदेश रद्द होणे कामी स्वतंत्र अर्ज दिलेला आहे. प्रकरण गुणदोषावर न्यायनिर्णयीत होणे कामी अर्ज करण्यास झालेला विलंब माफ होऊन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. प्रतिवादींच्या विधीज्ञांनी जोरदार हरकत घेवुन योग्य ते आदेश होण्याची विनंती केली.

०३. वादींनी सदर दावा हा ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. दाव्यातील नि.क्र.४५ कडील मृत्यू प्रमाणपत्र पाहता वादी क्र.१–ड हा दि.१३.०५.२०२० रोजी

मयत झाल्याचे दिसुन येत आहे. वादी यांनी विहित मुदतीत मयत वादी क्र.१–ड यांचे वारस फौलावर घेतले नाहीत त्यामुळे त्याचे विरुद्ध दावा नियमानुसार अबेट झालेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता सदर वादी क्र.१–ड यांच्या वारसांना दाव्यास कारण अस्तित्वात आहे. सन २०२० व २०२१ साली कोवीड–१९ या साथीरोगाने संपुर्ण भारत देश व जगामध्ये थैमान घातलेले होते. सदर कालावधी मध्ये लॉकडाऊन लागु करण्यात आले होते. सदर कालावधी मध्ये मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे कडील एस.ओ.पी. नुसार केवळ अतितातडीची प्रकरणे सुनावणी घेणेकामी निर्देशित करण्यात आलेले होते. त्यामुळे वादींतर्फे करण्यात आलेले युक्तीवादामध्ये तथ्य आढळुन येत आहे. सदर अर्ज मंजुर करुन झालेला विलंब माफ केल्यास दावा हा गुणदोषावर न्यायनिर्णयीत होणेकामी व पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत तसेच संपुर्ण वादाचे एकाच दाव्यामध्ये निवारण होणेस मदत होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे म्हणुन मी, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

०१. अर्ज नि.क्र.४२ मंजुर करण्यात येतो.

०२. वादी यांना मयत वादी क्र.०१–ड याचे विरुद्ध झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेकामी अर्ज करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by CHARUDATT UDDHAV SHIPKULE
Date: 2022.05.05 17:47:20 +0630

**ठिकाण–चंदगड** **(चारुदत्त उद्धव शिपकुले)**

**दिनांक – ०५.०५.२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,चंदगड.**